महाराष्ट्र शासन

जिल्हा समादेशक होमगार्ड कार्यालय,बीड
आवरगांवकर बिल्डींग,साठे चौक,बीड .जि.बीड- 431122
क्र :- 02442-222391 Email id-dchgbeed@yahoo.com

जा.क्र.330/प्रशा/ 2024 दिनांक 05/09/2024

**बीड जिल्हा होमगार्ड नवीन होमगार्ड सदस्य नोंदणी - २०२४**
**-:अंतिम निवड व प्रतिक्षा यादी बाबत जाहीर अधिसूचना -:-**

बीड जिल्हा होमगार्ड नोंदणी २०२४ करीता पोलीस मुख्यालय, बीड येथे दिनांक -23/०८/२०२४ रोजी महिला उमेदवारांची कागदपत्र पडताळणी व मैदानी चाचणी घेण्यात आली **व** २४/०८/२०२४ ते २८/०८/२०२४ रोजी पुरुष उमेदवारांची कागदपत्र पडताळणी व मैदानी चाचणी घेण्यात आली.

या कार्यालयाकडून दिनांक- ०३/०९/२०२४ रोजी पर्यंत उमेदवारांकडून आक्षेप मागविण्यात आलेले होते. कार्यालयास प्राप्त झालेल्या आक्षेपातील त्रुटीच्या अनुषंगाने दुरुस्त्या करून पुरुष व महिला उमेदवारांची अंतिम निवड यादी व प्रतीक्षा यादी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

होमगार्ड सदस्यत्वाकरीता अंतिम निवड उमेदवारांची गुणानुक्रमे यादी सोबत जोडण्यात आली आहे.तसेच प्रतीक्षा यादी ठेवण्यात आली असून प्रतीक्षा यादी हि दिनांक ३१/०३/२०२५ पर्यंत वैध राहील, त्यानंतर यादी संपुष्टात येईल. प्रशिक्षण संदर्भातील पुढील सूचनाकरीता **https;//maharashtracdgh.gov.in.mahahg/login१.php** हा या संकेतस्थळावर आणि आपले पथक कार्यालयाशी संपर्कात राहावे.तसेच अंतिम यादीत निवड करण्यात आलेल्या उमेदवारांनी खालील तक्त्यात दर्शविण्यात आलेल्या दिनांक रोजी पथकनिहाय **सकाळी १०.०० ते १६.०० या वेळेत** जिल्हा समादेशक होमगार्ड कार्यालय बीड येथे उपस्थित राहावे.

| अ.क्र | पथकाचे नाव | दिनांक |
|---|---|---|
| १. | बीड पथक | दि. ०५/०९/२०२४ ते १०/०९/२०२४ |
| २. | अंबाजोगाई पथक | दि. ०५/०९/२०२४ ते १०/०९/२०२४ |
| ३. | माजलगाव पथक | दि. ०५/०९/२०२४ ते १०/०९/२०२४ |
| ४. | गेवराई पथक | दि. ०५/०९/२०२४ ते १०/०९/२०२४ |
| ५. | पाटोदा पथक | दि. ०५/०९/२०२४ ते १०/०९/२०२४ |
| ६. | आष्टी पथक | दि. ०५/०९/२०२४ ते १०/०९/२०२४ |

अंतिम यादीत निवड झालेल्या उमेदवारांनी सोबत येताना मूळ कागदपत्र, मूळ तांत्रिक अहर्ता प्रमाणपत्र व त्याच्या झेरॉक्स प्रति व दोन फोटोसह उपस्थित राहावे. तसेच आपणाकडून बंधपत्र व हमीपत्र भरून देण्यासाठी उपस्थित राहणार नाहीत तसेच मूळ कागदपत्र पडताळणी करते वेळी काही त्रुटी निदर्शनास आल्यास अंतिम निवड यादीतून नाव व नोंदणी रद्द करून प्रतीक्षा यादीतील गुणानुक्रमे उमेदवारास घेण्याचे **सर्व अधिकार बीड होमगार्ड नोंदणी निवड समितेचे राहतील.याची सर्व संबंधित उमेदवारांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.**

**तसेच निवड झालेल्या उमेदवारांची पुढे पोलीस चारित्र्य पडताळणी व वैद्यकीय तपासणी करण्यात येईल या मध्ये अपात्र असल्याचे दिसून आल्यास कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराला अपात्र केले जाईल याची नोंद घ्यावी.**

**(एस.एस.जव्हेरी)**
**सदस्य सचीव**
**प्र.केंद्र नायक**
**पलटन नायक, होमगार्ड बीड.**

**(पी.पी.दलाई)**
**राखीव पोलीस निरीक्षक**
**पोलीस मुख्यालय, बीड**

**(सचिन पांडकर)**
**अध्यक्ष**
**जिल्हा समादेशक होमगार्ड तथा**
**अपर पोलीस अधिक्षक, बीड**